पत्र सूचना शाखा
सूचना एवं जनसम्पर्क विभाग, उ0प्र0

-----

# पंतप्रधानांना राज्यपाल श्री. राम नाईक यांची सदिच्छा भेट

## *उत्तर प्रदेशातील पूरपरिस्थितीसह अनेक विषयांवर चर्चा*

लखनऊ : 27 ऑगस्ट, 2014

उत्तर प्रदेशचे राज्यपाल श्री. राम नाईक यांनी आज पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे पंतप्रधान निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. श्री. नाईक यांनी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर ही पहिलीच भेट आहे.

राज्यपालांनी उत्तर प्रदेशातील पूर परिस्थिती व अन्य विषयांबाबत पंतप्रधानांशी सविस्तर चर्चा केली. या भेटीमध्ये राज्यपालांनी शिल्पकार श्री. उत्तम पाचारणे बनवित असलेल्या 21 परमवीरचक्र मानकऱ्यांच्या भित्तीचित्रांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली. त्याचप्रमाणे देशभरातील कुष्ठपीडितांच्या प्रश्नाकडे राज्यपाल श्री. नाईक यांनी पंतप्रधानांचे लक्ष वेधले. श्री. नाईक इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे अध्यक्ष होते. वर्ष 2007 मध्ये संसदेत कुष्ठपीडितांच्यावतीने श्री. राम नाईक व विविध कुष्ठपीडित संघटनांनी विनंती अर्ज सादर केला होता. त्या अर्जाबाबत विनंती अर्ज समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची विनंती श्री. राम नाईक यांनी पंतप्रधानांना केली.

अणुऊर्जा मंत्रालयाचा कारभार स्वतः पंतप्रधान बघत असल्याने तारापूर अणुउर्जा प्रकल्पाच्या विस्थापितांच्या पुनर्वसनात लक्ष घालून त्यांना लवकरात लवकर न्याय देण्याची विनंतीही श्री. राम नाईक यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना केली. तारापूर अणुऊर्जा प्रकल्प 3 व 4 मुळे 1,250 कुटुंबे विस्थापित झाली आहेत. त्यामध्ये मुख्यत्वे शेतकरी व मच्छिमार आहेत. या प्रकल्पपीडितांच्या पुनर्वसनाचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असून स्वतः श्री. नाईकही या खटल्यात सहभागी झाले आहेत.

-----

अंजुम / रा0 / राजभवन